मी झुगारत गेलो

मी झुगारत गेलो
अशाश्वत अर्थांना
पावलाच्या गतिरोधांना
ठेचाळणारे दगडधोंडे
आणि आणखी असे बरेच काही
मी दूर भिरकावत गेलो!
.....
अंधारकुशीत लपल्या चंद्राला
मी तळहातावर झेलून आणले
आभाळ पेलणाऱ्या झाडांच्या
चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी...
.....
सोललेल्या तळपायांचे साधन
झाले पंखातले बळ
मातीने उसासा सोडत
झेललेल्या रक्तथेंबाचे अर्ध्य मागे सोडत
मी
पुढे टाकलेल्या पावलांचे ठसे
मोजले नाही कधी!
.....
ऋतु आले, गेले
झाडे मोहरली... बहरली
पानगळीने पुन्हा नागडी झाली
मी ऋतुविहीन!
ऊन, वारा, पाऊस, वादळे
साऱ्या धडका सोसत मी पुढे गेलो...
सोशिकतेचे कवच जणू
परिस्थितीनेच केले दान!
.....
या परिस्थितीनेच शिकवले सारे
वावटळीत हेलकावूनही...
पुन्हा ताठ मानेने उभे राहणाऱ्या
झाडासारखे
मी अस्तित्वार्थाला जपत गेलो
.....
मी झुगारत गेलो
अशाश्वत अर्थांना
पावलाच्या गतिरोधांना
गतिरोधांना!

नागेश कांगणे
मेहकर, जि.बुलडाणा
भ्र. ९८५० १८४ ८२६

हाकतो बकऱ्या

हे दूरवर पसरलेय
माळरान; झडल्या पानांचे, वैतागल्या मनाचे.
सारे ओढे, नाले ओठंगून कोरडेठण्ण
पाणवठे उथळ उथळ स्वभावानुसार.
जमिनीला गेल्यात वितीवितीच्या भेगा काळीजकोरल्या.
चोच उलवून पाहताहेत पक्षी आभाळाकडे आशाळभूत.
दमछाक झालेली गुरे हुंगताहेत वाळके गवतकाडी.
तरी; मृगजळात बुडवून ओंजळ
सिरपत पितोय पाणी मनातल्या मनात
वठलेल्या झाडाच्या सावलीत
शिलगावतोय बिडी, सोडतोय धूर
सुकल्या दिवसांचे टिचवीत ऐने
हाकतो बकऱ्या
हर्र्हर्र् हर्र्हर्र्.

तो भी मरेगा!

दोन वाटांनी छेदले एकमेकांना तेथे
तो भेटला अवचित पानटपरीवर.
त्याच्या पानपरागी हसण्याने
मी गेलो हबकून.
पानाची पीक उडवीत तो बोलला,
''यार, कसल्या मुडच्या गोष्टी करतोस
आणि डुकरीगत कविता प्रसवतोस,
शब्दांनी क्रांती होते या नादापायी
च्या मायला! ही कसली रद्दी निर्माण केली
जिला नाही उंची, जिला नाही खोली''
आणि झर्रकन गाडीकडे वळून म्हणाला,
''यार! तुझ्यापेक्षा ही डिक्की बरी
जिथे लोहियांचे पुस्तक,
थ्री-एक्स रेड रम,
आणि बांगडा फिश
आरामसे सामावले आहे.
छोड यार, तूभी क्या करेगा?
झूठ बोलेगा तो मरेगा
सच बोलेगा तो भी मरेगाऽऽ!''

प्रमोदकुमार अणेराव
भंडारा
भ्र. ९४२१ ७९५ ५९८